**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ८८०/२०२४.**
**निशाणी क्र.५ पुढे**
**CNR No.–MHWR-050012392024**
**शासन विरुध्द संगीता तेलंग**

## न्यायनिर्णय
(दिनांक २२.०४.२०२६)

अभियोगपक्षाची खटल्यातील कथने विचारात घेता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावर कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दिनांक २१.०३.२०२४ रोजी, २०.०० ते २०.३० वाजण्याच्या सुमारास आरोपी हि मौजे पिंपळगाव येथे, ता. समुद्रपूर, जि. वर्धा येथील रहात्या घरामध्ये विनापरवाना बेकायदेशीररित्या एका कापडी पिशवीत देशी दारुने भरलेल्या १८० मि.ली.च्या ८ शिश्याची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगून होती, म्हणून तिने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला ? | .....नकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ करीता –**

२. अभियोग पक्षाने सदर प्रकरणात घटनास्थळ पंच साक्षीदार साधना

नंदकुटे अ. सा.क्रं.०१, फिर्यादी देवेद्र उडाण, अ.सा.क्र. ०२, तपासी अंमलदार राहूल मानकर, अ. सा.क्र. ०३ व मुद्देमाल सीए. कार्यालयात दाखल करणारा साक्षीदार कमलाकर ढेंगळे, अ.सा.क्र. ०४ यांना तपासले आहे. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, साक्षीदार क्र. ०१ हि घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार हि गावची पोलीस पाटील असून सदर साक्षीदाराने तिच्या सरतपासा दरम्यान तथाकथित घटनास्थळाच्या चर्तुःसीमा तसेच तथाकथित जप्त केलेल्या मुद्देमाल हा कोणत्या कंपनीचा होता तसेच त्याचा बॅच नंबर काय होता याबद्दल काहीही कथन केलेले नाही. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, सदर साक्षीदाराचा साक्षीपुरावा मोघम आहे. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, अभियोगपक्षाने घटनास्थळ पंचनाम्यावरील दुसरा पंच साक्षीदार यास तपासलेले नाही. त्यामुळे त्यांचे कथन की, सदर साक्षीदाराच्या मोघम साक्षीपुराव्यावर विसंबून रहाणे योग्य होणार नाही.

३. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, साक्षीदार क्र. ०२ ते ०४ हे पोलीस साक्षीदार आहेत. सदर साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यास पुष्टी देणा–या साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाने नोंदविलेली नाही. साक्षीदार क्र. ०३ व ०४ हे तथाकथित घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. साक्षीदार क्र. ०४ याने त्याच्या साक्षीपुराव्यामध्ये तथाकथित जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा सिलबंद होता किंवा कसे याबद्दल निश्चितरीत्या कथन केलेले नाही. तसेच सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीपुराव्या दरम्यान मुद्देमाल सी.ए. कार्यालयामध्ये जमा करण्याकरीता त्यास मिळाल्यानंतर ते मुद्देमाल सी.ए. कार्यालयामध्ये जमा करेपर्यंत सदर मुद्देमाल हा सिलबंद होता किंवा कसे याबद्दल कथन केलेले नाही. साक्षीदार क्र. ०२ याने घटनास्थळाच्या चर्तुःसीमा निश्चितरीत्या कथन केलेल्या नाहीत. तसेच

मुद्देमाल कोणत्या कंपनीचा होता व त्याचा बॅच नंबर काय होता याबद्दल सविस्तर असे वर्णन केलेले नाही. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, तपासी अंमलदार यांनी प्रस्तुत केस कामी घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार वगळता इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, साक्षीदार क्र. ०२ ते ०४ या पोलीस साक्षीदारांच्या साक्षीवर विसंबून राहून आरोपीच्या ताब्यातून देशी दारुने भरलेल्या १८० मि.ली.च्या ८ शिशया मिळून आल्या असे गृहित धरणे न्यायोचित होणार नाही. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, अभियोगपक्षाच्या कथनानुसार कथाकथित घटना हि २१.०३.२०२४ रोजी घडली. सदर तारखेपासून मुद्देमाल सी.ए. कार्यालयामध्ये जमा करेपर्यंत मुद्देमाल कोणत्या अवस्थेमध्ये होता याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा आलेला नाही. सदर मुद्देमाल सी.ए. कार्यालयात जमा केल्यापासून मुद्देमालाची तपासणी होई पर्यंत एका महिन्यापेक्षा जास्तीचा कालावधी का लागला तसेच सदर कालावधीमध्ये मुद्देमाल कोणत्या परिस्थितीमध्ये होता याबाबत अभिलेखावर काहीही आलेले नाही. अशापरिस्थितीमध्ये, आरोपी हि मौजे पिंपळगाव येथे, ता. समुद्रपूर, जि. वर्धा येथील रहात्या घरामध्ये विनापरवाना बेकायदेशीररित्या एका कापडी पिशवीत देशी दारुने भरलेल्या १८० मि.ली.च्या ८ शिश्याची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगून होती, असे निःसंशयपणे सिध्द झालेले नाही, म्हणून मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

४. मुद्दा क्र. १ चा नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता संशयाचा फायदा आरोपीला देऊन तीस दोषमुक्त करणे न्यायोचित होणार आहे, म्हणुन मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी संगीता नथ्थुजी तेलंग, वय – ४६ वर्षे, व्यवसाय– मजुरी, रा पिंपळगाव, ता. समुद्रपूर, जि. वर्धा, हिस भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८ (१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९, चे कलम ६५ (ई) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) प्रस्तुत गुन्हाकामी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा मुल्यहीन असल्याने त्याची अपील कालावधी संपल्यानंतर कायदेशीररीत्या योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.

४) आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे अपीलीय न्यायालयात हजर राहण्याकरिता रक्कम रुपये ५०,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र या न्यायालयात सादर करावे.

(प्रस्तुत न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PATIL PRAKASH LALASAHEB
Digitally signed by PATIL PRAKASH LALASAHEB
Date: 2026.04.22 16:09:23 +0530

ठिकाण – समुद्रपूर. ( पी. एल. पाटील )

दिनांक –२२.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, समुद्रपूर.

CERTIFICATE

Certified that PDF copy of judgment is word to word identification to the original order.

(A. A. More)
Stenographer Gr-III